# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.
दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in
मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/सा.प्र/१९८/२०२१-२२ दिनांक : ३०/०९/२०२१

## // परिपत्रक //

९३०८
९/८/२१

विषय :- शासन परिपत्रक क्रमांक: विमस-2013/प्र.क्र.67/18(र.व.का.), दि.27/07/2015 अन्वये विविध शासकीय कार्यक्रमासंदर्भात निमंत्रण पत्रिकेस राजशिष्टाचारानुसार मंजुरी देणेबाबत.

संदर्भ :- जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडील क्रमांक/सामान्य/ कक्ष-6/पीआरओ/06/2021,दि.08/06/2021, प्राप्त दि.18/06/2021

शासन परिपत्रक क्रमांक: विमस-2013/प्र.क्र.67/18(र.व.का.) दि.27/07/2015 अन्वये विविध शासकीय कार्यक्रमासंदर्भात निमंत्रण पत्रिकेस राजशिष्टाचारानुसार मंजुरी देणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र.2 (vii) मध्ये जिल्हास्तरावर विविध शासकीय कार्यक्रम आयोजित करतांना मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या अधिकाऱ्यांनी कार्यक्रम पत्रिका जिल्हाधिकारी कार्यालयातील राजशिष्टाचार शाखेकडून तपासून घ्यावी. त्यानुसार निमंत्रण पत्रिकेस मंजुरी मिळणेकामी विविध कार्यालयाकडून प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे प्राप्त होत असतात, असे मंजुरी प्रस्ताव नियोजित कार्यक्रमाच्या किमान 10 ते 12 दिवस आधी संबंधित कार्यालयास पाठविण्यांत यावे. सदर प्रस्ताव कार्यक्रमाच्या 2 ते 3 दिवस अगोदर पाठविण्यात येऊ नये व त्यामध्ये त्रुटी आढळून येता कामा नये. त्यानुसार शासन परिपत्रकांच्या अनुषंगाने खालील सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.2 मध्ये निमंत्रण पत्रिकेस राजशिष्टाचारानुसार मंजूरी देणेविषयी स्वयंस्पष्ट मार्गदर्शन करणेत आलेले आहे. त्यामध्ये नमुद केलेल्या सर्व तरतुदींच्या अधिन राहुन जिल्हास्तरावरील संबंधित विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी प्रारुप कार्यक्रम पत्रिका तयार करुन सदर पत्रिकेची या कार्यालयाकडुन पडताळणी करुन घेऊन मंजुरी



Scanned with CamScanner

प्राप्त करणे अपेक्षित आहे. या शासन निर्णयाचे मुद्दा क्र. (2) मध्ये याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत.

शासकीय लोकोपयोगी / विकासात्मक कामांच्या भूमिपूजनाच्या/ पायाभरणीच्या/ शुभारंभाच्या उद्‌घाटनाच्या इत्यादी संदर्भातील कार्यक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधीचा सहभाग महत्वाचा असतो म्हणून अशा कार्यक्रमाच्या वेळी त्या कार्यक्षेत्रातील सर्व विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य, लोकसभा/ राज्यसभा सदस्य महोदयांना योग्य ती पूर्वसूचना देऊन आंमत्रित करण्यात यावे. त्यांनाही विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे याची खातरजमा करून या समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावांचा उल्लेख असल्यास त्यामध्ये सन्माननीय स्थानिक खासदार/ आमदारांच्या नांवाचा समावेश करावा.

1. ज्या मतदारसंघात शासकीय कार्यक्रम असेल, त्या मतदारसंघातील सर्व सन्मानीय विधानमंडळ / संसद सदस्यांची नावे निमंत्रणपत्रिकेवर योग्य प्रकारे छापण्यात यावीत.
2. ज्या जिल्हयात शासकीय कार्यक्रम/ समारंभ असेल, त्या जिल्हयांच्या सन्मानीय पालक मंत्र्यांनाही सदर कार्यक्रमास आमंत्रित करावे. तसेच तत्संबंधिच्या निमंत्रण पत्रिकेवर सन्मानीय पालक मंत्र्यांचे नाव योग्यप्रकारे छापण्यात यावे व समारंभाच्या वेळी त्यांना आदराचे स्थान देऊन त्यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्था राजशिष्टाचारानुसार करण्यात यावी.
3. ज्या जिल्हयात शासकीय कार्यक्रम असेल, त्या जिल्हयातील सर्व सन्माननीय केंद्रीय मंत्री (मंत्री / राज्यमंत्री/ उपमंत्री) राज्यातील त्या जिल्हयातील सर्व सन्माननीय मंत्री (मंत्री/ राज्यमंत्री/ उपमंत्री) यांनाही योग्य ती पूर्वसूचना देऊन आमंत्रित करण्यात यावे. त्यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे याची खातरजमा करून समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेवर त्यांचे नाव योग्य प्रकारे छापण्यात यावे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागातील संबंधित अधिकारी यांनी उक्त शासन निर्णय क्रमांक : विमस- 2013/प्र.क्र.67/18 (र.व.का.) दि. 27/07/2015 च्या परिपत्रकातील मुद्दा क्र.2 मध्ये उक्त सर्व सन्मानीय लोकप्रतिनिधीना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत किंवा कसे याबाबत खातरजमा करुनच निमंत्रण पत्रिकेत त्यांचे नांव छापलेले आहे किंवा कसे या विषयी व या शासन निर्णयाप्रमाणे अपेक्षित सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधीचा यात समावेश करण्यात आलेला आहे, या विषयी प्रमाणापत्र दयावे.



Scanned with CamScanner

जेणेकरुन सदर शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे पडताळणी करणे शक्य होईल. संबंधित कार्यालयाकडे स्वतंत्र राजशिष्टाचार विभाग व राजशिष्टाचार अधिकारी नसल्याने प्रसंगी या संदर्भिय कार्यालयास शासनाचे राजशिष्टाचार विभागाचे मार्गदर्शक घ्यावे लागते. याबाबी विचार घेऊन मिरा भाईदर महानगरपालिकेतुन आलेले प्रस्ताव उपरोक्त प्रमाणपत्रासह व प्रारुप निमंत्रण पत्रिकेसह किमान 10 दिवस अगोदर या कार्यालयास पाठवावा जेणेकरुन संबंधित कार्यालयास पोहचतील याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with CamScanner